# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, छपत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे-401 101, दुरध्वनी क्र.022-28192828, Email :- mbmc.pro2012@gmail.com

माहिती व जनसंपर्क विभाग


जा.क्र.मनपा/मावज/ १८० /२०२२-२३

दि. २०/०३/२०२३

## //परिपत्रक//

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या माहिती व जनसंपर्क विभागामार्फत पालिकेच्या विविध कार्यक्रमांची, ध्येय धोरणांची, उपक्रमांची तसेच लोकार्पण सोहळयांची माहिती शहरातील लहान मोठया, वयोवृध्द नागरीकापर्यंत पोहचवीणे कामी व्यापक प्रमाणात जनजागृती केली जाते. सदरची जनजागृती वृत्तपत्रात जाहिरात देणे, जाहिर आवाहन करणे तसेच प्रेसनोटच्या माध्यमातुन केली जाते. सोशलमिडीयाच्या माध्यमातुन सुध्दा व्यापक प्रमाणात प्रसिध्दी दिली जाते. सोशलमिडीयाच्या वापरात मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत चालु केलेले वॉटस अँप, फेसबुक, टिवटर व इंस्ट्राग्राम चा वापर करुन व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देऊन जास्तीत जास्त लोकापर्यंत माहिती पोहोचविणेचे काम केले जाते.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागामार्फत होणाऱ्या कार्यक्रमांना व्यापक प्रसिध्दी मिळण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागामार्फत प्रसिद्ध देणे अपेक्षित आहे. माझ्या निर्देशनास असे आले की, आपल्या विभागामार्फत परस्पर जनजागृती करणे कामी निविदा मागविल्या जातात मात्र आपल्या विभागाकडुन सदर कामांची व्यापक प्रसिध्दी केली जात नाही. तसेच सदर कामांची दुबार नोंद होवून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपल्या विभागामार्फत होत असलेल्या कामांची माहिती वेळेत फाटोसहित माहिती व जनसंपर्क विभागाकडे देवून जनजागृती केल्यास माहिती व जनसंपर्क विभागाचे महत्व वाढेल व जनजागृती करण्याच्या कामात होणाऱ्या खर्चाची बचत सुध्दा होईल.

यापुढे कोणत्याही विभागाने फोटोग्राफी, व्हिडीओग्राफी, डॉक्यूमेंट्री व जनजागृती करणेकामी परस्पर दरपत्रक/निविदा मागवू नयेत. जनजागृतीकामी माहिती व जनसंपर्क विभागाकडे Detail scope of work सह रितसर मागणी नोंदवावी व सदर कामी यापूर्वी आपल्या विभागामार्फत सुरु असलेल्या निविदांची/दरपत्रकाची कामे अर्थसंकल्पीय तरतूदीसह या विभागामध्ये वर्ग करण्यात यावीत. तसेच यापूवी केलल्या कामाचे फोटो, व्हिडीओ, डॉक्यूमेंट्री (चित्रफीत) व सविस्तर माहिती सॉफ्टकॉपीमध्ये (पेनड्राईव्ह) उपलब्ध करण्यात यावी.

(दिलीप ढोले)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
अतिरिक्त आयुक्त (१) व (२),
उपायुक्त (सर्व),
शहर अभियंता,
नगररचनाकार,
मुख्य वित्त अधिकारी,
मुख्य लेखापरिक्षक,
सर्व विभाग प्रमुख व सहायक आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

C:\Users\Jansampark\Downloads\परिपत्रक 4).docx